**[ श्री. शशिकांत शिंदे ]**

माननीय मंत्री यांनी मघाशी सांगितले की, ही बाब महानगरपालिकेकडे असल्यामुळे शासनाला याची कल्पना नाही. माझा प्रश्न असा आहे की, जर शासनाच्या सूचनेप्रमाणे १४ अटींचा भंग केला तर 'ना-हरकत प्रमाणपत्र' रद्द करण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे. माननीय मंत्री यांना माझा असा प्रश्न आहे की, या ठिकाणी १४ अटींचे पालन केले आहे काय ? या अटी व शर्तीचा भंग केला तर यासंदर्भातील कार्यवाही रद्द करण्यात येणार आहे काय ? या ५०० बफर झोनमध्ये रहिवाशी येत आहेत, यासंदर्भातील अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय ? अहवाल पाठविण्यात आला नसेल तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ?

**श्री. भास्कर जाधव** : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारित आहेत. मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे. आता आणखी एक नवीन प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. जिल्हाधिकारी यांनी ज्या अटी व शर्ती घालून मंजुरी दिली होती, त्या अटी व शर्तीची पूर्तता झाली किंवा नाही ? त्यांचे पालन झाले किंवा नाही ? अटी व शर्तीचे पालन झाले नसेल तर शासन काय करणार आहे ? असे तीन चार वेगवेगळे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांची वेगवेगळ्या पद्धतीने मी उत्तरे दिली आहेत. मी सभागृहाला अशी माहिती देऊ इच्छितो की, या अटी व शर्तीचे पालन झाले किंवा नाही, याची चौकशी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव (दोन) करतील. यामध्ये काही अनियमितता झाली असेल किंवा काही चुकीचे निर्णय घेतले असतील, बांधकामाच्या परवानग्या चुकीच्या पद्धतीने दिल्या गेल्या असतील तर या सर्व बाबींची चौकशी करण्यात येईल. याबाबत आवश्यक ती कारवाई करून त्याची माहिती सभागृहाला देण्यात येईल.

---

## नियम स्थगित ठेवण्याबाबतचा वित्तमंत्र्यांचा प्रस्ताव

**श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री)** : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

" अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील ७ दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

**उपाध्यक्ष** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस) पुढे ढकलण्यात आली आहे.